**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**
**वि ए. पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१ (१ जून २०००)**
**विनिमय नियंत्रण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**मुंबई ४०००२३**

**१ जून २०००**

**<u>ए. पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१</u>**
**ए. पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१**

प्रति,

परकीय विनियमातील सर्व अधिकृत व्यक्ती

**परकीय विनिमय व्यवस्थापन कायदा (फेमा) १९९९**

संपूर्ण मुद्रा परिवर्तकांचे दिनांक १६ मे २०००च्या एडी(एम ए सिरिज)परिच्छेद ४ कडे लक्ष वेधण्यात येते, ज्यामध्ये सुचित करण्यात आलेले आहे की, त्यामधील सुचना ह्या पुर्वलक्षी प्रभावाने मुद्रा परिवर्तकांना लागू राहतील आणि, एफएलएम/आरएलएम मध्ये होणाऱ्या दुरुत्यांचे त्यांच्यावरील नियंत्रण कायम राहिल. फेमा १९९९ मधील अटींनूसार सध्याचा दुरुस्ती केलेला अधिनियम खालीलप्रमाणे आहेः

1. मान्यताप्राप्त कारणासाठी अदा करण्यास, परवानगी देण्यात आलेली विनिमय मात्रा

(a) नेपाळ व भूतान वगळता अन्य कोणत्याही देशास एका दिनदर्शिका वर्षामध्ये एका व्यक्तिस एक किंवा अधिक खाजगी भेटी देण्यासाठी ५००० अमेरिकी डॉलर्स किंवा समकक्ष चलनापेक्षा जास्त नाही इतके विनिमय, बीटीक्यु (एफएलएमचा परिच्छेद १०) नुसार, परिवर्तन मात्रेच्या प्रमाणात देण्यास आता परवानगी देण्यात आलेली आहे.

(b) व्यावसायिक कारणासाठी (त्याचा व्यावसायिक कारणासाठीच्या वास्तव्याचा काळ गैरलागू आहे.) एका व्यक्तिला मुद्रा परिवर्तनाच्या विविध चालु दरांच्या तुलनेत, २५,००० अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त नाही इतके, देण्यास (एफएलएम परिच्छेद ११) नुसार परवानगी दिलेली आहे.

2. **कागदपत्रे**

असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, येथून पुढे मुद्रा परिवर्तकांनी, परकीय चलन देताना, पडताळणी करण्याची कागदपत्रे, रिझर्व्ह बँक तपासणार नाही. यादृष्टीने मुद्रा परिवर्तकांचे परकीय विनिमय व्यवस्थापन कायदा १९९९ (१९९९ मधील ४२) सेक्शन १० सबसेक्शन (५)कडे लक्ष वेधण्यात येत आहे. ज्यामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, प्राधिकृत व्यक्तिने कोणत्याही व्यक्तीसाठी परकीय चलनामधील व्यवहार करताना, सदर व्यक्तिने परकीय चलन मिळण्यासाठी केलेली घोषणा अणि त्यासाठी दिलेल्या माहितीवरुन, या कायद्याचे किंवा कोणत्याही नियमाचे अथवा त्याअंतर्गत जारी केलेल्या अधिनियम, परिपत्रक, सुचना किंवा आदेशाचे उल्लंघन किंवा

दुरुपयोग करुन व्यवहार केला जात नाही याची खातरजमा करुन घेण्याची आहे. मुद्रा परिवर्तकांना असेहि सुचित करण्यात येते की, ज्या माहितीच्या / कागदपत्रांच्याआधारे असा व्यवहार करण्यात आला ती कागदपत्रे रिझर्व्ह बँकेच्या पडताळणीसाठी राखून ठेवण्याची आहेत. सदर कलमामध्ये पुढे असे म्हंटले आहे की, सदर व्यक्ती (अर्जदार) जर एखाद्या पुर्ततेस नकार देत असेल किंवा त्याची असामाधानकारक पुर्तता करीत असेल तर, अधिकृत व्यक्तिने लेखी स्वरुपात असा व्यवहार नाकारण्याचा आहे. आणि त्याला सदर व्यक्तीकडून उल्लंघन किंवा दुरुपयोग झाल्याचा संशय येत असेल तर, सदर प्रकाराची रिझर्व्ह बँकेस माहिती देण्याची आहे.

3. एफएफएमसी ना सुचित करण्यात येत की, एफएलएमच्या अन्य तरतुदींचे त्यांच्यावरील नियंत्रण सुरु राहिल.

4. एफएलएम मधील दुरुस्त्या या वेगळ्या जारी करण्यात येतील. दरम्यानच्या काळात प्राधिकृत व्यक्ती या परिपत्रकातील मजकूर त्यांच्या संबंधीतांच्या नजरेस आणू शकतील.

5. सदर परिपत्रकामधील मजकूर हा परकीय विनिमय व्यवस्थापन कायदा १९९९ (१९९९ चा ४२) सेक्शन १०(४) आणि सेक्शन ११(१) नूसार जारी करण्यात आलेला आहे. याच्या विपरित कृती किंवा या सुचनांकडे दुर्लक्ष हे या कायद्याखाली नमूद शिक्षेस पात्र राहिल.

**आपला विश्वासु,**

**बी. महेश्वरन**
मुख्य महाव्यवस्थापक